

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव.

मा. कार्याध्यक्षसो,
प्राचार्य अभयकुमार साळुंखे
७७ वा ज्ञानशिदोरी दिन विशेषांक





# स्नेहकुंज वार्तापत्र

संपादक : डॉ. बी. एम. पाटील | कार्यकारी संपादक : डॉ. एम. एस. उभाळे | अंक - २ रा | वर्ष - १ ले | १७ जानेवारी २०२२



## संपादकीय - प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था अंतर्गत बी.एड आणि डीएलएड विद्यासमिती विभागामार्फत मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसा निमित्त स्नेहकुंजचा दुसरा अंक प्रकाशित करताना अत्यानंद होत आहे. पहिला अंक संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या स्मृती दिना निमित्त मा. कार्याध्यक्षसो अभयकुमार साळुंखेसाहेबांच्या हस्ते कोल्हापूर येथील प. पू. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पवित्रसमाधी स्थळी प्रकाशित करण्यात आला. या अंकाचे वाचकवर्गातून भरभरुन कौतुक केल्याचे दिसून आले.



संस्थेमध्ये जानेवारी हा दिवस मा, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस होय. हाच वाढदिवस ज्ञानशिदोरी यानावाने संस्थेमध्ये सर्व गुरुदेव कार्यकर्ते आवडीने व उत्साहाने प्रत्येक वर्षी साजरा करत असतात. या दिनाचे औचित्य साधून बी. एड. आणि डीएलएड विद्यासमिती विभागामार्फत स्नेहकुंज वार्तापत्रकाचा दुसरा अंक हा विशेष अंक म्हणून प्रकाशित करुन वाचकांच्या हाती देताना अत्यानंद होत आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य अतिशय मोलाचे आहे. संस्थेने बहुजन वर्गासाठी शिक्षणाची गंगोत्री घरोघरी पोहचविण्याचे कार्य १९५४ साला पासून केले जात आहे. सध्या संस्थेची एकूण संस्कृती केंद्रे ४०६ आहेत. यामध्ये प्रशिक्षणशिक्षक नवनिर्मिती करण्याचे कार्य करणारी संस्कृती केंद्रे आहेत. या संस्कृती केंद्रापैकी मराठवाडा विभागात ५ आहेत व पश्चिम महाराष्ट्रात ६ आहेत. सरासरी सदर संस्कृती केंद्रे ही ३५-५० वर्षापासून महाराष्ट्राला शिक्षणक्षेत्रासाठी उत्तम कौशल्ययुक्त शिक्षक पुरविण्याचे कार्य करत आहेत. अशा या संस्कृती केंद्रातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्याव्दारे सदर अंक प्रकाशित करत आहोत.

हा अंक प्रकाशित करण्याचा मुख्य उद्देश साहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचा उलगडा करुन गुरुदेव कार्यककर्त्यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय व नियोजनाचा संस्थावाढीसाठी दिलेल्या योगदानाच्या कार्याची प्रचिती देणे असा आहे. वास्तविक पाहता एका अंकातून साहेबांच्या कार्याची प्रचिती देणे म्हणजे त्यांच्या कार्याला मर्यादा घालून दिल्या सारखे आहे. असे अनेक अंक काढल्यावरच त्यांच्या कार्याची माहिती सूक्ष्मपणे मांडता येईल. म्हणून साहेबांच्या कार्यासाठी एक आदरभाव निर्माण व्हावा यासाठी हा अंक काढण्याचा मानस आम्ही सत्यात उतरत आहोत.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभयकुमार साळुंखे यांनी स्वत:ची अशी खास ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करताना प्रथम कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांचे वडिल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक व संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. गोविंद ज्ञानोजीराव साळुंखे म्हणजेच बापूजी साळुंखे व मातोश्री संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आहेत. तसेच साहेबांना तीन बहिणी व दोन भाऊ असा गोतावळा आहे. साहेबांचा जन्म १७ जानेवारी १९४४ साली बेळगावातील होसूर येथे झाला. घरात त्यांना थोरमंडळी आवडीने बबन असे संबोधतात.

साहेबांचे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागातील रुकडी गावापासून झाले व उच्च शिक्षण शिवाजी विद्यापीठात झाले. या कालावधीत प.पू. डॉ. बापूजी साळुंखे व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा.आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण पूर्ण केले. यांच्या मार्गदर्शनाचा फायदा संस्थेच्या वाढीसाठी आजपर्यंत होत आहे.

साहेबांच्या नोकरीची सुरुवात आपल्याच संस्थेचे राजे रामराव महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सुरुवात केली, तसेच प्राचार्य, सेक्रेटरी, अध्यक्ष, अशी विविध पदे त्यांनी भूषविलीत तसेच सध्या कार्याध्यक्ष म्हणून संस्थेत कार्यरत आहेत. साहेबांच्या प्रशासकीय कार्यामुळेच संस्थेचा विस्तार, गुणवत्तेचे यशोशिखर गाठण्याची प्रचिती आपल्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना आलेली पहावयास मिळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सेक्रेटरी पदाचा कार्यभार १९८५ साली स्विकारल्यावर संस्थेत ३३० संस्कृतिक केंद्रे कार्यरत होती. त्यावरुन सध्याच्या ४०६ संस्कृतिक केंद्रे १३ जिल्हयात विद्याज्ञानाचे महान कार्य करत आहेत, अशा या महान व्यक्तिमत्त्वाचे आदर्श, मार्गदर्शन, संस्थेतील गुरुदेव कार्यकर्त्यांनी घ्यावेत यासाठी सदर अंक आम्ही प्रकाशित करत आहोत.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी मा. प्राचार्या, शुभांगी गावडे मॅडम यांना राष्ट्रीय स्तरावरील शिक्षारत्न जीवन गौरव पुरस्कार व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व्दारे दिला जाणार- २०२२ चा आधुनिक सावित्री पुरस्कार प्राप्त झाल्याने संस्थेच्या नावलौकिकात भर पडलेली आहे. सदर वार्ता अंकात प्रकाशित करण्यास आम्हा गुरुदेव कार्यकर्त्यांना आनंद वाटत आहे.

नवीन शैक्षणिक धोरण राबविताना संस्थास्तरावर कोणकोणत्या शैक्षणिक समस्या येतील याबाबत प्राध्यापकांकडून अभ्यासपूर्वक व चिंतनात्मक लेख मागवून घेतले आहेत. यातील काही निवडक लेख संपादकीय मथळ्या खाली पुस्तक रुपाने शिक्षणमहर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंती निमित्त ९ जून रोजी प्रकाशित करणार आहोत.

या अंकात बी.एड. आणि डीएलएड विद्यासमिती विभागामार्फत या शैक्षणिक वर्षात चांगले उपक्रम राबविण्याचे प्रयत्न केले आहेत. यामध्ये शिक्षक पात्रता परीक्षेचे ऑनलाईन वर्ग चालू करण्यात आला या वर्गाला महाराष्ट्रातून ११० विद्यार्थी सहभागी होऊन यशस्वीपणे परीक्षा दिली. ११ शाखेतील प्राध्यापकांच्यात ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी तंत्रविज्ञानाचे कौशल्य विकसित करण्यासाठी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयावर वेबिनार घेण्यात आले आहेत. एनसीटीई व्दारे PAR यशस्वीरित्या भरण्यासाठी कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले आहे. अशा विविध उपक्रमाचे प्रतिबिंब बातमी स्वरुपात उमटलेले आहे.

हा अंक बी.एड. आणि डीएलएड विद्यासमिती विभागामार्फत मा. कार्याध्यक्षसाहेब यांना सर्व शाखांचे प्राचार्य व प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक यांनी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देवून त्यांना आई तुळजाभवानीच्या कृपेने उदंड आयुष्य मिळावे अशा हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## निर्मळतेचा निर्झर - प्राचार्य अभयकुमार साळुंखे



-प्रा. जी. के. पाटील तासगाव

श्वासामधी श्वास
बापूजींचा श्वास
मनी साहेबांचा ध्यास
संस्था महाराष्ट्राचा व्यास
करवीरनगरी ज्ञानाचा न्यास

महालक्ष्मीच्या करवीर नगरीला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या न्यासाने तक्षशिलेप्रमाणें ज्ञानक्षेत्राचे तीर्थक्षेत्र बनवले. ही बापुजींची समाजाप्रती अपूर्व त्यागाची प्रचिती. संस्था उत्कर्ष रूपाने आणि विस्तार गतीने आपणास दृष्टोत्पत्तीस येते आहे. चित्त समाधान पावते आहे. बापूजींनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा पाया स्वामी विवेकानंदांच्या नावातच दिसतो.

बापूजी युगपुरुष, द्रष्टासमाज सुधारक ठरले. कारण या महापुरुषाने,ज्ञानमहर्षीने युवा पिढीला ज्ञानग्रहण करताना स्वामींचा जप करावा म्हणून संस्थेचे नाव श्री स्वामी विवेकानंद संस्था असे दिले. बापूजींनी संस्थेच्या प्रार्थनेतून मांडलेल्या तत्वज्ञानाचा जागर करीत, आपले आयुष्य अध्यात्माच्या शिरकावाने मंगल करून, दैनंदिन जीवनात पावित्र्य जपण्याची महाशक्ती बापूजींनी दिली. भगवान श्रीकृष्ण, बुद्ध, झरतूष्ठांची शांती, ऐक्याचा संदेश घेत राष्ट्रीय ऐक्य आणि मुक्ती मार्ग साधता येतो हा विचार शाळा महाविद्यालयातून चांगला रुजावा. युवा पिढी सुसंस्कारित व्हावी, यासाठी साहेब शाखाप्रमुखांना, गुरुदेव कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांना, प्रार्थना तालासुरात म्हणा असा आग्रह करतात.

बापूजींनी संस्थेची जी पंचसूत्री सांगितली त्यात सत्य,चारित्र्य, प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग ही मानवी जीवनातील उदात्त तत्वे आचरणात आणल्यास आपले जगणे मांगल्याचे होईल आणि देश मंगलमय होईल,अशी साहेबांची दृढ श्रद्धा आहे. गेली चार तपाहून अधिक काळ संस्था प्रशासन करीत असताना 'एका चित्ती ध्यास बापूजीं प्रति' या न्यायाने साहेब सिमीत जगले. अहंकाराला स्पर्श करू दिला नाही. बापूजींच्या तत्वज्ञानाच्या पाऊल वाटेने चालताना साहेबांना आजही कधी दमछाक झाल्याचे पाहिले नाही. बापूजींच्या उत्साहाचा निर्झर म्हणजे साहेब. आज कोणी म्हटले 'तुमच्या साहेबांनी युवापिढीला काय दिले?' तर अभिमानाने आम्ही सांगू बापूजींच्या तत्वज्ञानात जो आचार आणि विचारधर्म होता, तो साहेबांनी स्वतः अंगीकारला. त्याचे आपल्या अमोघ वक्तृत्वाने नीतीच्या धर्मात रूपांतरित करून गावागावात, नितीचार अंगीकारणारी युवा पिढी तयार केली आणि तीच आज संस्था विकासाची नवी फळी तयार होते आहे. आणि बापुजींची जुनी पिढी त्यांना विश्वास पूर्ण सहकार्य करते आहे. याचे फलित म्हणजे २१ व्या शतकातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील गुणवत्तेतील गरुड भरारी होय.

स्वामीजींची विचारधारा ही लोकधारा बनली आणि साहेबांनी ही लोकधारा संस्थेचा नारा म्हणून स्वीकारली. त्यामुळे साहेबांना बापूजींच्या नात्यानेच लोकांनी स्वीकारले. आणि राज्यकर्त्यांना त्यांनी सन्मानित केले. साहेब शाखांना भेटी देताना बापूजींच्या जुन्या कार्यकर्त्यांशी विनम्र होतात, त्याची विनम्रता युवा पिढी पाहते आणि साहेबांशी युवा पिढी नम्र होते. आज गावोगावी साहेबांना बापूजींच्या प्रमाणे आदरातिथ्याने वागवले जाते. याचे कारण समाज आणि शिक्षणाचा रेशीमधागा बापूजींनी ज्या आत्मीयतेने बांधला तो साहेबांनी जपला.

नॅनोटेक्नॉलॉजी च्या काळात महाराष्ट्र उभा राहावयाचा असेल आणि कोरोना काळात तो टीकायचा असेल तर शासन अभिमानाने म्हणते 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ऑनलाईन शिक्षण पद्धती अंमलात आणा' महाराष्ट्राला गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था संबोधणारा वसा साहेबांनी दिला. एका निगर्वी, संयमी, दृष्टीदात्यासाहेबांच्या नेतृत्वाची गरज या देशाला,शिक्षण व्यवस्थेला आहे. म्हणूनच ईश्वराला म्हणावे वाटते,'माझ्या साहेबाला, बहुजनांना ज्ञानाची ताकद देण्यासाठी, सामर्थ्यशाली शिक्षण व्यवस्थेच्या निर्मितीसाठी शक्ती दे ! दीर्घायुष्य दे !! हीच वाढदिवसादिवशी अपेक्षा. आमुचा निर्मळतेचा निर्झर आमचचे आयुष्य सुखाऊ दे !

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०-एक अवलोकन



- प्रा. सौ. प्रभा घोरपडे

कोठारी आयोगाने शिक्षणातील गुणात्मक बदलासाठी १०+२+३ हा आकृतीबंध सांगितला होता त्यानुसार इयत्ता पहिली ते पाचवी निम्न प्राथमिक शिक्षण, इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतचे उच्च प्राथमिक शिक्षण , इयत्ता नववी व दहावी पर्यंतचे माध्यमिक शिक्षण व त्यानंतर दोन वर्षाचे उच्च माध्यमिक शिक्षण आणि तीन वर्षाचे पदवीचे शिक्षण असावे

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार ५+३+३+४ आकृतीबंध सांगितलेला आहे पहिला टप्पा-मूलभूत शिक्षण-त्यानुसार सुरुवातीच्या पाच वर्षांमध्ये तीन वर्ष अंगणवाडी पूर्व शाळा शिक्षण व दोन वर्ष इयत्ता पहिली ते दुसरी(३-८) वर्षे.

वय वर्षे ३ ते ८ या वयोगटात मुलांमध्ये असलेली उत्सुकता, जिज्ञासा याचे पुरेपूर समाधान व्हावे असा उद्देश असणार आहे. प्रत्येक मुलांमध्ये अक्षर वाचन, अक्षर ओळख व संख्या ज्ञान या क्षमता विकसित झाल्याच पाहिजेत.

दुसरा टप्पा- प्रारंभिक शाळा-तीन वर्ष- तीसरी ते पाचवी इयत्तेमध्ये शिकतील. या टप्प्यात प्रयोग आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान, चित्रकला इत्यादी विषय शिकवले जातील.

तिसरा टप्पा-माध्यमिक शाळा-तीन वर्षे-या टप्प्यात इयत्ता सहावी ते आठवी इयत्तेतील विद्यार्थ्यांचा समावेश असेल. सहावीतील विद्यार्थ्यांना कोडींग, व्होकेशनल कोर्सेस शिकविले जातील व इंटर्नशीप करून घेतली जाईल.

चौथा टप्पा-माध्यमिक शाळा-चार वर्षे-या टप्प्यात इयत्ता नववी ते बारावीतील विद्यार्थ्यांचा समावेश असेल. या इयत्तेतील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. विज्ञान, वाणिज्य, कला अशा तीन शाखांची बंधने या धोरणाने तोडून टाकली आहेत.

इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी हा अत्यंत वैशिष्ट्य पूर्ण बदल केलेला टप्पा आहे यात सखोल ज्ञानासोबत व्यावसायिक शिक्षणावर भर दिला आहे म्हणजेच विद्यार्थी क्रमिक अभ्यासक्रमासोबत आपल्या इच्छेप्रमाणे संगीत, नृत्य, खेळ, लोककला शिकू शकणार आहेत. शिवाय एखादा व्यवसाय सुद्धा शिकूशकणार आहेत यात प्रत्यक्ष

पान नं. ३ वर

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०-एक अवलोकन

पान नं. १ वरुन
कामाचा अनुभव देखील विद्यार्थी घेऊ शकतील व विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच रोजगारासाठी आवश्यक कौशल्य विकसित झाल्यास विद्यार्थी स्वावलंबी होतील.

उच्च शिक्षण-नवीन शैक्षणिक धोरणात महाविद्यालयीन शिक्षणात करण्यात येणारे बदल हे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व उपयोगी आहेत. यामध्ये जगातील उत्कृष्ट विद्यापीठ म्हणून निवडलेल्या विद्यापीठांना भारतात काम करण्यास सुलभ केले जाईल. परदेशी विद्यापीठच भारतात येत असल्यामुळे भारतात उच्च दर्जाच्या शिक्षणाची सोय होईल व पूर्वीप्रमाणे विदेशातील विद्यार्थी शिक्षणासाठी भारतात येतील.

उच्च शिक्षणात बहुशाखीय शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे म्हणजे कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्यांना केवळ एका शाखेचे शिक्षण न मिळता अनेक शाखांचे शिक्षण मिळेल . याचा अर्थ उच्च शिक्षण हे दर्जेदार गुणवत्तापूर्ण व समस्या सोडवणारे झाले पाहिजे आणि साधारण कमी आर्थिक क्षमता असणाऱ्यांना उच्च शिक्षण घेता आले पाहिजे.

या धोरणात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना तीन गटात विभागण्यात आले आहे. देशातील पहिल्या गटातील संस्था या संशोधनाचे आणि पूरक अध्यापनाचे काम करतील. दुसऱ्या गटातील संस्थांमध्ये उच्च दर्जाचे अध्यापन करण्यात येईल. तसेच पूरक संशोधनही चालेल तिसऱ्या गटातील संस्थांमध्ये पदवीपूर्व अध्यापनाचे कार्य चालणार आहे त्यांच्यावर संशोधनाचे ओझे टाकलेले नाही.

नवीन शैक्षणिक धोरणात असे नमूद केले आहे की विद्यार्थ्याने कुठल्याही कारणाने मध्येच शिक्षण सोडून दिले तर घेतलेले शिक्षण वाया जाणार नाही. बॅचलर डिग्री चार वर्षाची करण्यात आली असून एक्झिट ऑप्शन देखील देण्यात येणार आहे. एका वर्षात बाहेर पडणाऱ्यांना प्रमाणपत्र व दोन वर्षात बाहेर पडणाऱ्यांना पदविका, तीन वर्षानंतर पदवी चार वर्षाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्यांना संशोधनासह ऑनर्स पदवी दिली जाईल. सद्यस्थितीत हा पर्याय उपलब्ध नसल्याने शेवटच्या वर्षी जरी शिक्षण थांबवले तरी डिग्री मिळत नाही. शिवाय सर्व विद्यापीठे २०४० पर्यंत बहुआयामी बनविण्याचा प्रस्ताव आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बारावीनंतर चार वर्षाचा इंटिग्रेटेड बी.एड. कोर्स ची सुरुवात करण्यात आली आहे म्हणजे विद्यार्थी शिक्षक होणार हे बारावीनंतरच ठरले जाईल. आणि तो एक परिपक्व शिक्षक बनू शकेल. अध्यापन हा नैतिक दृष्ट्या व बौद्धिक दृष्ट्या अतिशय आव्हानात्मक व्यवसाय आहे. शिक्षकांनी खूप मेहनत घेऊन पूर्वतयारी करून अध्यापनातील विविध कौशल्य हस्तगत करणे गरजेचे आहे.

२१ व्या शतकात भारत जगाचे नेतृत्व करेल हे सत्यात आणण्यासाठी हे नवीन शैक्षणिक धोरण एक मैलाचा दगड ठरणार आहे हे निश्चित आहे .गरज फक्त त्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन तुमच्या आमच्या मध्ये विकसित करण्याची आहे.

## इ. ५ वी व ६ वी : नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार परीक्षा व मूल्यमापन पद्धती



प्रा. श्रीमती थोरबोले आर. टी., तासगांव

इ ५ वी,६ वी प्रचलित परीक्षा व मूल्यमापन पद्धती–

आरटीई २००९ नुसार सहा ते चौदा या वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली. १६ जून २०१० च्या शासन निर्णयानुसार अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याबाबत आदेश निघाला आणि कलम २९ नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती लागू झाली.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत असताना नियमित करण्याचे मूल्यमापन म्हणजे आकारिक मूल्यमापन होय. यामध्ये दैनंदिन निरीक्षण, तोंडी काम, प्रात्यक्षिक प्रयोग, वैयक्तिक किंवा गटातील, प्रकल्प, वेळापत्रक जाहीर न करता छोटीशी चाचणी घेणे, स्वाध्याय, वर्गकार्य आणि प्रश्नावली,स्वयंमूल्यमापन, गटकार्य, सहाध्यायी मूल्यमापन इत्यादी साधनं तंत्राचा वापर करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मुख्य विषयासाठी यामधील किमान पाच साधनतंत्रे वापरणे तर कला, कार्यानुभव आणि शारीरिक शिक्षण यासाठी किमान तीन साधनतंत्रे वापरणे आवश्यक आहे. संकलित मूल्यमापनामध्ये लेखी,तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षांचा समावेश केलेला आहे. संकलित मूल्यमापन हे पूर्वापार चालत आलेले आहे. इयत्ता ५वी व ६ वीसाठी ५० गुणांचे आकारिक, १० गुणांची तोंडी व ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाते.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार परीक्षा व मूल्यमापन पद्धती–

अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती यामध्ये बदल झाल्यावर मूल्यमापन प्रक्रियेतील बदल देखील क्रमप्राप्त ठरतो. प्रचलित मूल्यमापन पद्धतीतील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न नवीन धोरणातील मूल्यमापन प्रक्रियेद्वारे केला जाईल. पाठांतर करून उत्तरे लिहिण्याऐवजी दैनंदिन जीवनातील उपयुक्त अशा ज्ञानावर आधारित परीक्षा पद्धतीला प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या घोकंपट्टी पद्धतीला आळा बसेल.शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठीचे निकष, मानके व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे. नवीन धोरणानुसार परीक्षा अशा प्रकारे झाली पाहिजे की विद्यार्थ्यावर त्याचा विनाकारण दबाव पडू नये. केवळ एका परीक्षेतून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन न करता विविध पद्धती वापरता येतील.उदा. स्व मूल्यमापन ,पीअर टू पीअर पद्धती (विद्यार्थ्यांनी परस्परांचे केलेले मूल्यमापन) इ.

इ. ५ वी साठी योग्य प्राधिकरणाद्वारे परीक्षा घेतली जाईल. पूर्वाध्ययन स्तरावरील निश्चित केलेली पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यातील सक्षमतेचे मूल्यमापन या परीक्षेद्वारे केले जाईल. विशिष्ट प्राधिकरणाद्वारे परीक्षा घेतल्यामुळे सर्वत्र मूल्यमापनामध्ये समानता प्रस्थापित होईल. इयत्ता ५ वी व ६ वी या वर्गातील विद्यार्थ्यांची आकलनीय, भावात्मक व शारीरिक क्षेत्रातील प्रगती पाहण्यासाठी परीक्षेबरोबरच शिक्षकांच्या मूल्यमापनासह स्व मूल्यमापन,सहाध्यायी मूल्यमापन यांचा समावेश करण्यात येईल.

स्व मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्याने स्वत:चे मूल्यमापन स्वत: करणे आवश्यक असेल. दुसऱ्या कोणीतरी केलेले मूल्यमापन काही वेळेला विद्यार्थ्यांना चुकीचे वाटू शकते पण स्व मूल्यमापनामुळे स्वत:च्या त्रुटी, कमतरता मान्य करून त्यामध्ये सुधारणा करता येतील. त्याचबरोबर स्वत:ची मूल्यमापन क्षमता देखील वाढविता येईल. पण हे साधन वापरताना इतर साधने वापरून नेमके काय तपासायचे आहे याची स्वयंस्पष्टता असायला हवी. इथे शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या स्वयंमूल्यमापनाला उपयुक्त ठरतील अशी साधने तयार करून ती कशी वापरावीत याविषयी विद्यार्थ्यांना सक्षम करणे गरजेचे असेल. यासाठी प्रश्नसूची, पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी अशा साधनांचा वापर करता येईल.

इ. ६ वीच्या पाठ्यक्रमामध्ये व्यवसाय शिक्षणाचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे कौशल्य विकसनावर अधिक भर असेल आणि या कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी प्रात्यक्षिक मूल्यमापन पद्धती उपयुक्त ठरेल. त्यामध्ये निरीक्षण, मुलाखत ही तंत्रे वापरता येतील. एखाद्या स्थानिक व्यवसायाला उदा.सुतारकाम करणाऱ्याला शाळेत बोलवावे,त्याच्याशी प्रश्नोत्तरे करावीत, त्याच्या कामाचे स्वरूप समजून घ्यावे. त्यातून विद्यार्थी किती शिकला?याचे मूल्यमापन करता येईल.व्यवसाय अभ्यासक्रमावर आधारित संग्रहात्मक, सर्वेक्षणात्मक, संशोधनात्मक असे विविध प्रकल्प देता येतील. प्रकल्पाच्या मूल्यमापनातून विद्यार्थ्यांमध्ये असलेली सर्जनशीलता शोधता येईल, तिचा विकास करता येईल. विविध व्यवसायांना क्षेत्रभेटी देऊन त्याचे मूल्यमापन करता येईल.

या पद्धतीबरोबरच प्रश्नमंजुषा, नाट्यीकरण,सांघिक कार्य,पोर्टफोलिओस, तोंडी कार्य इत्यादी पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेता येईल. मूल्यमापनामध्ये या विविध पद्धतींचा वापर करत असताना तंत्रज्ञानाच्या वापराला प्राधान्य देणे आवश्यक असेल. इ. ६ वीच्या पाठ्यक्रमात संगणक कोडिंगचा समावेश करण्यात आला आहे. त्याचे मूल्यमापन करण्यासाठी संपूर्णत: तंत्रज्ञानावर भर द्यावा लागेल.सध्या देखील काही विशिष्ट परिस्थितीमध्ये मूल्यमापनासाठी गुगल फॉर्म, टेस्टमोज इत्यादींचा वापर केला जात आहे. अशा तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रमाणात करण्यावर भर दिला जाईल. कारण नवीन धोरणांमध्ये अभ्यासक्रम,अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन या सर्वामध्ये तंत्रज्ञानाच्या वापराला प्राधान्य दिले आहे. यासाठी शिक्षकांनी तंत्रस्नेही बनणे अनिवार्य झाले आहे.

नवीन धोरणानुसार मूल्यमापन अधिक अधिक फॉर्मेटिव्ह करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच आजची प्रगती पुस्तिका विद्यार्थ्यांसाठी तणाव पत्रिका बनली आहे. अभ्यासामुळे येणाऱ्या या ताणातून मुलांना बाहेर काढणे हे नवीन राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट आहे. आता गुणपत्रिकेऐवजी समग्र अहवाल पत्रक (होलिस्टिक रिपोर्ट कार्ड) करण्यावर भर देण्यात येईल. समग्र अहवाल पत्रक हे विद्यार्थ्यांच्या क्षमता, योग्यता, बुद्धिमत्ता, कौशल्य, कार्यक्षमता, स्पर्धात्मकता यांचे सविस्तर पत्रक असेल. ज्याच्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या सुप्त गुणांचे दर्शन होईल. याचा फायदा विद्यार्थ्याला त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी नक्कीच होऊ शकेल.

■■■

## इ. १ व २ री : नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

प्रा. प्रवेश श्रीकांत कनवाडे, पाटण



विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास तो सुध्दा सर्वांगीण विकास होय हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय आहे. विदयार्थ्यांचा भावनिक विकास, बौध्दिक, शारीरिक विकास, नैतिक व सामाजिक या सर्व अंगाचा विकास म्हणजे सर्वांगीण विकास होय. मानवी जीवनात मिळणारे शिक्षण आणि मानवी जीवन यांची सांगड घालता आली पाहिजे. हे केवळ ज्ञानाचा साठा करून ठेवण्यापुरते मर्यादित नसते तर मिळणा-या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात, व्यवहारात उपयोग करता आला पाहिजे. म्हणून इथे समर्थ रामदासांच्या ओळी आठवतात ''जे जे आपणाशी ठावे, ते ते दुस-याशी सांगावे शहाणे करूनी सोडावे सकलजन''

अध्यापन ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे. विविध विषयांच्या अध्यापनातून विदयार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व आकारास येत असते. म्हणूनच कोणताही विषय शिकवताना विषयातील माहिती बरोबरच वेगवेगळया वृत्ती अभिरूची, सवयी यांचा विकास करण्यावरही भर दिला पाहिजे. म्हणून अध्यापनाचा मूळ उददेश विदयार्थ्यांना केवळ ज्ञान किंवा माहिती देणे नसून विदयार्थ्यांच्या मन:शक्तीचा व प्रवृत्तीचा विकास करणे.

शिक्षकी पेशामध्ये अध्यापन पध्दतीस खूप महत्त्वाचे स्थान आहे. व्यावहारिक अर्थाने अध्यापन म्हणजे शिकवणे. वर्गात शिक्षक विदयार्थ्यांना अध्यापन करतात असे बोलले जाते. खरे तर अध्यापन हे शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचे प्रभावी माध्यम आहे. तर अध्यापन पध्दती हे एक साधन आहे. अध्यापन करताना ज्या प्रक्रियेचा अवलंब केला जातो तिला अध्यापन पध्दती असे म्हणतात. शिक्षण प्रक्रियेत तीन प्रमुख प्रश्नांचा विचार केला जातो. काय शिकवायचे ? का शिकवायचे ? आणि कसे शिकवायचे ? यातील कसे शिकवायचे याचा विचार म्हणजेच अध्यापन पध्दती होय.

आता उद्या येवू घातलेल्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अध्यापन पध्दतीत तंत्रज्ञानाची भर घातली आहे. आतापर्यंत आपण विविध अध्यापन पध्दती वापरून विदयार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन सुकर व्हावे यासाठी प्रयत्न करत होतो. उदा. कथन पध्दती, कथा-कथन पध्दती, उद्गामी अध्यापन पद्धती, अवगामी अध्यापन पध्दती, व्याख्यान पध्दती, परिसंवाद पध्दती, चर्चा पध्दती, नाटयीकरण पध्दती, भूमिका अभिनय अध्यापन पध्दती, आशययुक्त अध्यापन पध्दती, विदयार्थी प्रधान अध्यापन पध्दती, सहकार्यात्मक अध्यापन पध्दती, सहयोगी अध्यापन पध्दती, कृतीयुक्त अध्ययन-अध्यापन पध्दती अशा विविध अध्यापन पध्दती आपण वापरत होतो. जेणेकरुन आपण शिकवलेला भाग विदयार्थ्यांना लवकर समजावा.

जयजगदा आचार्य विनोबा भावेंचा संदेश अध्यापन व अध्ययन यातील सूक्ष्म फरक स्पष्ट केला. नवीन शैक्षणिक धोरणात विविध रंगी संकल्पना आणि चांगले आदर्श समाविष्ट आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय शिक्षणाची रचना १०+२ ऐवजी ५+३+३+४ अशी करण्यात आली आहे. नवीन शैक्षणिक धोरण एक नवीन पहाट यामध्ये विदयार्थ्यांना केंद्रबिंदू ठरवले गेले आहे. पूर्वीची शिक्षण पध्दती शिक्षककेंद्री होती. परंतू आजची शिक्षण पध्दती ही विदयार्थीकेंद्रित आहे. यात विदयार्थ्यांला विशेष असे महत्त्व दिले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात विदयार्थ्याला शिक्षा करायची नाही. त्यांना आनंददायी शिक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक विदयार्थ्याला शिक्षणाबद्दलची गोडी, आवड निर्माण झाली पाहिजे. तो हसतमुखाने शिक्षणाकडे आकर्षित झाला पाहिजे. कोणताही विदयार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी सर्व प्रयत्न केला आहे. म्हणून उच्च स्तरावर सेमिस्टर पध्दत राबवली आहे. जर का त्याचे मध्येच काही कारणास्तव शिक्षण राहिले तर तो पुढील सेमिस्टर त्याच्या सवडीने सोडवू शकेल.

प्राथमिक स्तरावर विदयार्थ्यांना हसत-खेळत शिक्षण मिळाले पाहिजे. त्याचा शिक्षणाबद्दलचा उत्साह वाढला पाहिजे. म्हणून या विदयार्थ्यांस अगदी साध्या-साध्या सोप्या-सोप्या अध्यापन पध्दतीनुसार शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न नक्कीच फायदेशीर ठरणार आहे. हे मात्र नक्की कृतीतून शिक्षण ज्ञानरचना वादानुसार शिक्षण अशा नव-नवीन संकल्पनांचा यात विचार केला आहे. त्याचा मनापासून सर्वांनी स्वीकार करूयात.

■■■

## इ. ९ व १० वी : नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

श्रीमती कोळी एस. आर., तुळजापूर

आपल्या देशात सर्वात प्रथम पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९६८ साली पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आले. त्यानंतर राजीव गांधी यांच्या कार्यालयात १९८६ साली दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ते १९९२ साली राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण धोरण कृती आराखडा तयार करण्यात आला. गेल्या ३४ वर्षानंतर आणि २१ व्या शतकातील पहिली शैक्षणिक सुधारणा २०२० मध्ये करण्यात आलेली आहे.

शालेय शिक्षणासाठी ५+३ + ३ + ४ रचनेवर आधारीत बौद्धिक विकास व अध्ययन तत्वावर आधारित अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे. या धोरणानुसार माध्यमिक शाळा इयत्ता नववी १५ वर्ष पूर्ण व इयत्ता १० वी १६ वर्षे विद्यार्थ्यांचे पूर्ण होणे गरजेचे आहे. इयत्ता नववी ते १२ वी एकत्र करून चार वर्षाचा कोर्स प्रस्तावित आहे. ज्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र अशा शाखानिहाय फरक रद्द करून एकूण ८ सेमिस्टरचा हा कोर्स असेल त्यात विद्यार्थ्याला भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील. २१ व्या शतकाची प्रमुख कौशल्ये, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सक विचार वाढविण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि अनुभवातून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा अभ्यासक्रम आणि शिकवण्याच्या पद्धतीचा उद्देश असणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार बोर्ड परिक्षांचे महत्व कमी करण्याचे ठरले असून आता बोर्ड परीक्षा फक्त १२ वी मध्ये घेतली जाणार आहे. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या सत्र परीक्षा असतील. पाठानंतर करून उत्तर लिहिण्याऐवजी दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारित परीक्षा असेल. इयत्ता ९ वी १० वी यातील अभ्यासक्रम आणि अध्ययन विषयक मुलांच्या आकलनात्मक आधारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पध्दती जास्तीत जास्त परिणामकारक बनवली. ज्यासाठी अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय पारंपारिक मूल्ये आणि सर्व मुलभूत व घटनात्मक मूल्ये सेवा, अंहिसा, स्वच्छता, सत्य, शांती, त्याग इ. विविधात्मक दृष्टिकोन मूलांना मध्ये विकसित करण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमातून होणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये काही मुलभूत प्रतिभा असतात. त्या शोधल्या पाहिजेत त्याचे संगोपन केले पाहिजे.

नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र दिलेले आहे. २१ व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. इ. ९ वी, इ. १० वी वर्षातील मुलांना ज्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र असा शाखा निहाय फरक रद्द केला असून एकूण ८ सेमीस्टरचा हा कोर्स असेल त्यात भाषा, गणित, शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील. यासाठी अपेक्षित ध्येय गाठण्यासाठी शाळांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरविणे या धोरणाचा समावेश आहे.

## शाखेचा इतिहास : कमला नेहरु अध्यापक विद्यालय, कराड



कराड नगरीमध्ये कोयना कृ ष्ण ेच्या पवित्र प्रीतिसंगमावर, निसर्गरम्य परिसरात बापुजींनी वसवलेली शाखा म्हणजे कमला नेहरू अध्यापिका विद्यामंदिर. संस्थेची सुरुवात करताना बापुजींनी प्राथमिक शाळा हायस्कूल, कॉलेज स्थापन करत असताना बापुजींच्या मनात ट्रेनिंग कॉलेज असले पाहिजे असा विचार आला. कारण या सर्व शिक्षण संस्थांसाठी सक्षम शिक्षक तयार होणे गरजेचे होते. संस्थेचे ध्येय आहे की ज्यांना शिक्षणाची संधी नाही त्यांना शिक्षणाची संधी निर्माण करून देणे. मध्ये सर्वात दुर्लक्षित घटक होता तो म्हणजे महिला ज्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे ही काळाची गरज होती. यासाठीच त्यांनी ' क्त महिलांसाठी या कॉलेजची स्थापना केली.

_ या कॉलेजमध्ये सुरुवातीला ज्युनिअर पीटीसी व सीनिअर पीटीसी हे कोर्स सुरु झाले. मध्ये पहिल्या तुकडीसाठी मुलीनी कमला नेहरू अध्यापिका विद्यामंदिर मध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी वी नंतर ज्युनिअर पी.टी.सी व वी किंवा त्यावेळची मॅट्रीक नंतर सिनिअर पी.टी.सी हे दोन कोर्स सुरु होते. मुलींच्या राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून होस्टेलची सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात आली. कमला नेहरू डीएलएड कॉलेजला निसर्गाचे वरदान लाभले आहे. याचा लाभ म्हणून भाजीपाला

**▌प्राचार्या, सौ. अनिता आनंद पोतदार**

पिकवणे, फळभाज्या लावणे, वेगवेगळ्या झाडांचे संवर्धन असे विविध उपक्रम विद्यार्थीनी कार्यानुभव अंतर्गत राबवत असत. यातूनच मेस साठी भांज्याची गरज सुद्धा पूर्ण होत असे. मुलींसाठी चांगले जेवण, सुरक्षित वातावरण, दर्जेदार शिक्षकवृंद यामुळे कमला नेहरू हे नाव सातारा जिल्ह्यामध्ये नावारूपाला आले. कमला नेहरू कॉलेजचे नावच शिस्तीसाठी प्रसिद्ध आहे. आजही हाच नावलौकिक टिकून आहे.

बापूजींनी वेळोवेळी भेट देऊन या शाखेला त्यांचा आशीर्वाद दिलेला आहे. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या कॉलेजच्या भूमीला अनेक प्राचार्य लाभले त्यातील या शाखेचे पहिले प्राचार्य मा. एस. बी. काकडे सर होते, त्यांचा शिस्तबद्ध स्वभाव, उपक्रमशीलता, संस्थेप्रती असणारे प्रेम व आदर यामुळे कमला नेहरुची वाटचाल प्रचंड वेगाने झाली. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीची संख्या वाढल्याने संस्थेला आणखी दोन तुकड्या विनाअनुदानित तत्वावर चालू कराव्या लागल्या होत्या.

आमच्या कमला नेहरू ज्यु. कॉलेज कराड मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## शाखेचा इतिहास : अध्यापक विद्यालय, नळदुर्ग



विद्यालय १९६१ साली मान्यता घेऊन सुरू केले पहिल्यांदा हे विद्यालय अणदुर या ठिकाणी भरत होते त्यानंतर काही काळ हे विद्यालय नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ला यामध्ये भरले व नंतर १९६० /६१ ला स्वतःची जागा खरेदीखत केल्यानंतर त्या ठिकाणी ते भरवण्यात आले श्री बडबडे यांची २७ गुंठे व श्री रणे यांचे जवळपास ८३ गुंठे जमीन खरेदीखत करून संस्थेचे संस्थापक परम पूज्य डॉक्टर बापूजी यांच्या मार्गदर्शनानुसार निसर्गरम्य परिसरामध्ये ९ रूमचे बांधकाम संस्थेच्या शाखेतील सर्व गुरुदेव कार्यकर्त्याने केले व आजतागायत हे व्यवस्थित आहे निसर्गरम्य परिसरामध्ये विद्यालय भरते जवळजवळ तीन एकर जागेमध्ये या विद्यालयाच्या सभोवती संपुर्ण झाडे आहे सागाची, लिंबची झाडे , चिंचेची झाडे लिंबाची झाडे वडाची झाडे व इतर झाडे आहेत असे झाडांनी नटलेला परिसर आहे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी प्रोत्साहित वातावरण आहे

**▌प्राचार्य, सुरेश केराप्पा अंकुशराव**

याठिकाणी प्राचार्य म्हणून सध्या श्री सुरेश अंकुश राव हे काम पाहत आहे व त्याच बरोबर त्यांच्या सोबत इतर स्टा' एकँदरीत या ठिकाणी प्रथम वर्षाची ४० वर्षाची ४० व सेवांतर्गत ५० विद्यार्थी सध्या प्रथम वर्ष वर्षाची४९ पूर्ण प्रवेश झाले आहेत अशा या विद्यालयांमध्ये रिझल्ट ची परंपरा चांगले असूनसंस्थेच्या ध्येय

धोरणानुसार काम पाहत आहे संस्थेचे कार्याध्यक्ष मा अभयकुमार साळुंखे साहेब यांनी वेळोवेळी या शाखेला प्रत्यक्ष भेट देऊन व इतर माध्यमातून मार्गदर्शनकरतात संस्थेचे मराठवाडा विभागाचे विभाग प्रमुख माननीय प्राचार्यडॉ देशमुख साहेब हेही शाखेला भेट देऊन मार्गदर्शन करतात अशा प्रकारे संस्थेच्याधोरणानुसार या शाखेचे कामकाज चालू आहे.

आमच्या अध्यापक विद्यालय, नळदुर्ग मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## शाखेचा इतिहास : अध्यापक विद्यालय, उस्मानाबाद

अध्यापक विद्यालय उस्मानाबाद NCTE कोड ११२२४५ SCERT कोड ८२०२ हा आहे दिनांक ५ /५ /१९६१ ला या शाखेची स्थापना करण्यात आली त्या काळापासून अध्यापक विद्यालय बीड महाविद्यालयात संलग्न होते या शाखेत प्रथम CPEd म्हणून मान्यता देण्यात आली यानंतर १९६९ ला फिजिकल डीएड म्हणून मान्यता देण्यात आली १९६१ पासून या विद्यालय चा कार्यभार बीड महाविद्यालयाचे प्राचार्य बघत होते महाविद्यालयाचे मा. देसाई सर यांच्या कारकिर्दीत अध्यापक विद्यालयाची इमारतीचे काम करण्यात आले १९९८-९९ पर्यंत ४० प्रवेशक्षमता होती त्यानंतर इ सन २००० मध्ये यांची NCET ने Staff कमी असल्यामुळे पुन्हा २२ विद्यार्थी क्षमतेची पत्र



**▌प्राचार्य, पवार दत्तात्रय हरीभाऊ**

दिले व इसवी सन २००० पासून २०१४ पर्यंत २२ प्रवेश क्षमता या विद्यालयाची होती त्यानंतर डॉ. सुलभाताई देशमुख या बीडच्या प्राचार्यांनी २०१४ मध्ये प्रवेश प्रवेश क्षमता वाढवून ती २२ वरून ५० करून आणली आणि २०१४ पासून प्रवेश क्षमता वाढल्यामुळे संस्थेने प्रभारी प्राचार्य म्हणून श्री पवार डी. एच. नियुक्ती केली यांची नियुक्ती केली व मी सध्या २०२०-२१ प्रवेश क्षमता ४० व २०२१-२२ प्रवेश क्षमता ४२ अशी आहे.

आमच्या अध्यापक विद्यालय उस्मानाबाद, मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## शाखेचा इतिहास : श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद



बापूजींनी मराठवाडयात सर्वप्रथम उस्मानाबाद येथे रामकृ ष्णा परमहंस महाविद्यालयाच्या रुपाने मूर्हतमेढ रोवली. त्यानंतर बापूजीची दूरदृष्टी सर्व संस्कार केंद्रासाठी आवश्क मनुष्यबळाची आवश्यकता होती. म्हणून उस्मानाबाद येथे संस्थेचे पहिले अध्यापक महाविद्यालय मध्ये स्थापन केले. मराठवाडयातीलच नव्हे तर संस्थेच्या सर्व संस्कार केंद्रासाठी गुरुदेव कार्येकर्त तयार करण्याचे कार्य सुरु झाले. संस्थेला ४ ऑगस्ट,१९६० रोजी शासनाने मान्यता देऊन आर्य समाज मंदिरात अध्यापक महाविद्यालयाचे वर्ग सुरु झाले. त्यानंतर मध्ये अध्यापक महाविद्यालयाची इमारत बांधून झाली. इमारत बांधकामासाठी सरकारने ३५०००/- रुपये अनुदान देण्यात आले होते.

इमारतीच्या उदघाटन तत्कालिक मंत्री ना. भाऊसाहेब वर्तक याच्या हस्ते झाले. त्यानंतर राणे

**▌प्राचार्या, डॉ. सुलभा देशमुख**

सर मराठवाडा विद्यापीठात शिक्षणशास्त्राचे अधिष्ठाता होते. त्यावेळेस विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग म्हणजे महाविद्यालय होते. त्यामुळे महाविद्यालयाच्या लौकिकात भर पडली.

त्यानंतर नोंव्हेबर, पासून प्राचार्या सौ. एस. डी. देशमुख मॅडमच्या कारकिर्दीतच महाविद्यालयास कायमस्वरुपी विद्यापीठ संलग्नीकरण प्राप्त झालेले आहे, त्यानंतर संस्थयेच्या आदेशानुसार महाविद्यालयाचा नामविस्तार करण्यासाठी शासनपातळीवर प्रयत्न करुन महाविद्यालयास त्यागमती संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचे नाव देऊन महाविद्यालयाचे आता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद असा नामविस्तार झाला आहे.

आमच्या श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्यु. उस्मानाबाद मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## शाखेचा इतिहास : श्री तुळजाभवानी अध्यापक विद्यालय, तुळजापूर

श्री तुळजाभवानी बेसिक ट्रेनिंग कॉलेज, श्री. तुळजाभवानी अध्यापक विद्यालय अशी विविध नावे पूर्वीच्या मान्यता कागदपत्रांमध्ये उल्लेखित आहेत श्रीक्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानीच्या नावे १९६० पासून सदर विद्यालय प्रशिक्षण केंद्र म्हणून सुरु आहे. १९६० पासून महाराष्ट्रातील हजारो शिक्षक ,शासकीय पदाधिकारी या शाखेतून सेवेत गेले आहेत. विशेष बाब म्हणजे पत्रद्वारा प्रशिक्षण योजना अंतर्गत विविध शासकीय योजनेचे अनेक अप्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षित होऊन मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात कार्यरत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील विशेष प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता आहे. शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाचे अनेक वर्ग राबवून त्यांचे अध्यापन अध्यावत करणे आणि आर्थिक स्तर उंचावण्यामध्ये विद्यालयाचे मोलाचे योगदान आहे. केंद्र शासनाच्या



**▌प्राचार्य, दोंड शशिकांत नागनाथ**

नॅशनल इन्स्टिटय़ूट ऑफ ओपन स्कूलींग, राष्ट्रीय मुक्त शिक्षा अंतर्गत डी. एल. एड. कोर्स गेल्या दोन वर्षापासून चालू असून एक वर्गाचे पूर्ण प्रशिक्षण झाले आहे .

लोकवर्गणीतून भारत सुस्थितीत करण्यात आली आहे. भौतिक सुविधा, लाईट, पाणी, क्रीडांगण, स्वच्छतागृह, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कक्ष, वृक्ष लागवड व संवर्धन यामुळे वातावरण आनंदी व पर्यावरण पूरक आहे ज्यामुळे विद्यार्थी आनंदी वातावरणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात प्रवेश घेत आहेत.

आमच्या श्री तुळजाभवानी अध्यापक विद्यालय, तुळजापूर मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## शाखेचा इतिहास : गुरुजन अध्यापक विद्यालय, पाटण



शिक्षणमहर्षी बापूजींनी १९ ऑक्टोबर, १९५४ या दिवशी कराड येथे मुरलीधराच्या मंदिरात काही सहका-यासह बापूजीनी शिक्षणसंस्था काढण्याचा संकल्प सोडला व ती संकल्पना १ नोंव्हेबर, १९५४ रोजी मूर्त स्वरुपात आली ३१ डिसेंबर १९५४ रोजी संस्थेची नोंदणी होवून ती रीतसर अस्तित्वात आली. स्वामी रामानंद भारती हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले. विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य वेगाने वाढत गेले. त्यासाठी बापूजींनी अपार कष्ट घेतले. बापूजी आपल्या कार्यामुळेच शिक्षणमहर्षी झाले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोप-यात शिक्षणप्रसार घडून आला.

बापूजींच्या जन्मभूमीत स्वतः बापूजींनी सन १९५९ रोजी गुरुजन ज्युनिअर कॉलेज ऑ' एज्युकेशन पाटण या शाखेची स्थापना केली. तळागाळातील डोंगर कपा-यातील विदयार्थ्यांना शिक्षणाबरोबरच अध्यापन करण्याची संधी मिळावी. ही संधी आपल्या संस्थेबरोबर अन्य संस्थेमध्ये गुरुदेव कार्यकत्यांना मिळावी या उदात हेतूने कॉलेजची स्थापना केली.

गुरुचे गुरु जे सतत कार्यरत असतात असे ते गुरुदेव कार्यकर्ते म्हणजेच अध्यापकाचार्य, जिथे तन, मन, धन सर्वस्वी अर्पण करुन सर्वगुण संपन्न शिक्षक घडविते. ते अध्यापक विदयालय म्हणजे ज्ञानाचे मंदिर होय. जीवनाचा पाया हा प्राथमिक शाळेतील ज्ञान, विज्ञान आणि सुरंकारावर आधारित असतो. या सर्वगुण संपन्न पिढी

**▌प्राचार्य, डॉ. पी. एन. पाटील**

घडविण्याचा पाया रचतो प्राथमिक शिक्षक सर्वोत्कृष्ट शिल्पकार होय.

शिक्षणाची प्रयोगशाळा मानला जाणारा महाराष्ट्र खरोखर महान आहे. शिक्षणातून अपेक्षित व्यक्तीमत्वाबरोबरच चारित्र्यही घडविणे आवश्यक असते त्यामुळे प्राप्त परिस्थितीत प्रत्येक अध्यापक विदयालयाने सर्वप्रथम चारित्र्य संपन्न व सुसंस्कारी शिक्षक घडविण्याचा प्रयत्न करते. यासाठी कॉलेजमध्ये विविध उपक्रम राबविले जातात छात्राध्यापकांना औपचारीक अशा दोन्ही वातावरणात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष शैक्षणिक अनुभूती देवून त्यांच्यात कृतीशील शिक्षकाची बीजे पेरली जातात. छात्राध्यापकामध्ये सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, पिळवणूक वृत्तीस आळा, सेवा आणि त्याग या मौलिक निष्ठा उतरविणेचा प्रयत्न करणे सामान्य समाजाच्या सुसंस्कारी विकासाच्या ध्येयासाठी वाहून घेणारे आदर्श समाजसेवक निर्माण करणे. आचार, विचार आणि उच्चार यांच्या पावित्र्यावर आग्रहपर्वक भर देणे. स्वतंत्र विचारवृत्ती व नवनिर्मिती यांची कुवत विकसीत करणे हे आहे.

आमच्या गुरुजन अध्यापक विद्यालय पाटण मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

**कोरोना के बचाव के
उपाय अपनायें
मास्क पहनें, दो गज की
दूरी बनायें...**

## शाखेचा इतिहास : अध्यापक विद्यालय, बीड



बापूजींनी मराठवाडा विभागामध्ये स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोहण्याचा संकल्प केला होता. तत्कालीन शिक्षण संचालक डॉ.आपासाहेब पवार यांच्या समवेत बापूजी प्रथमच बीड मध्ये आले होते.

बीड हा जिल्हा निजाम राजवटीमुळे मागासलेल्या अवस्थेत होता.बीडमध्ये निजामकालीन संस्कृती रूजल्यामुळे बीड जिल्हा साहजिकच शैक्षणिक दृष्टया मागासलेला होता. त्यामुळे येथिल लोक मागासलेले जीवन जगत होते. निजामाच्या जुलमामुळे नकारात्मक वृत्तीच बनलेली होती.

जिल्हयाचे मुख्यालय बिंदुसरा नदीच्या काठावर,सौताडा अभयअरंण्य आणि कंकालेष्वर मंदिर असलेल्या बीड शहराची इतिहासात स्वतंत्र अशी ओळख आहे. बीड शहरात शिक्षणाचा आरंभ १९१० मध्ये श्री मुंडे मास्तरांच्या खाजगी शाळेपासून झाला.

आषा याशैक्षणिक दृष्टया मागास भागात

**▌प्राचार्य, सरकुंडे ज्ञानेश भागवत**

बापूजींनी श्री. ॲड. दादासाहेब कोल्हे, ॲड. देशमुख, श्री. काशिनाथराव जाधव, श्री. रामलिंग स्वामी, श्री नरहरराव तुंगार, श्री. जगन्नाथराव औटी आणि श्री श्रीपतराव कदम यांच्या आग्रहाणे बीडच्या या दुष्काळ भागात प्रथम आपले आगमण केले.

बीड नगरीती व्यक्तिच्या अग्रहाने आणि बापूजींच्या अथक परिश्रमाणे ०३ जुलै १९६५ रोजी अध्यापक विद्यालयाची स्थापना झाली.

तेव्हा पासून आजतागायत निरंतर या अध्यापक विद्यालयातून बापूजींच्या विचारांची भावि शिक्षकांच्या जीवनांत आचरणात उतरवण्याची जबाबदारी हे अध्यापक विद्यालय करीत आहे.


आमच्या अध्यापक विद्यालय, बीड मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

''जीवनात उदात्तता वाढली पाहिजे, बोलण्याप्रमाणे कृती असली पाहिजे तरच स्वतंत्र देशातील नागरीक सुसंस्कारीत होतील.''

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## शाखेचा इतिहास : संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगांव

**प्राचार्य, डॉ. बी. एम. पाटील**



शाखा इतिहास- महिला शिक्षण शास्त्र महाविद्यालय तासगाव

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षक-प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने, सन जून १९८४ मध्ये 'महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची' विनाअनुदानित तत्वावर स्थापना केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. वसंतदादा पाटील यांनी इंदिरा गांधी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील सर्व प्रकारचे मुलींना शिक्षण देणाऱ्या व सर्व विद्याशाखांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सन १९८९ साली महाविद्यालयास अनुदान प्राप्त झाले.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्रभारी प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील यांच्या प्रयत्नाने महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचा नामविस्तार करण्यासाठी संस्थेकडे प्रयत्न केले व त्यानुसार संस्थेने एकमताने ठराव मान्य करून संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय असा नाम विस्तार करण्यात आला. या नावाला शिवाजी विद्यापीठ,महाराष्ट्र शासन तसेच NCTE यांनी मान्यता दिलेली आहे.

सध्या महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी ५० व द्वितीय वर्षासाठी ५० अशा १०० विद्यार्थिनी शिक्षण-प्रशिक्षण दरवर्षी घेत असतात.सध्या सुसज्ज इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे.

आमच्या महिला महाविद्यालयातील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## मा. सेक्रेटरी, प्राचार्या शुभांगी गावडे मॅडम



यांना
शिक्षारत्न जीवन गौरव पुरस्कार
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यत्ता केंद्राव्दारे
सन २०२२ चा
आधुनिक सावित्री पुरस्कार
मिळाल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा....



## शाखेचा इतिहास : अध्यापक विद्यालय, तासगांव

**प्राचार्य, तोरस्कर आण्णासो बाळासो**



संस्थेचे संकल्पक संस्थापक परम पूज्य डॉक्टर बापूजी साळुंखे यांनी संस्थेची स्थापना १९५४ सली केली .बापूजींनी संस्थेच्या अनेक संस्कार केंद्रांची निर्मिती केली. जनसामान्यांच्या दारामध्ये ज्ञानगंगोत्री बापुजी यांनी पोचवली .आज महाराष्ट्रातील अनेक दीन दलित वंचित ,अशा असंख्य गरीब मुलांना ह्या संस्कार केंद्रातून संस्कार केले जातात.

परम पूज्य डॉक्टर बापूजी साळुंखे यांनी अध्यापक विद्यालय तासगाव या शिक्षक प्रशिक्षण केंद्राची स्थापना १३ जून १९६० .रोजी केली. बापूजींच्या भविष्यातील शिक्षणाचा वेध घेणाऱ्या विचाराने असे ठरवले की माझ्या संस्थेच्या संस्कार केंद्रात शिकविणारा शिक्षक हा माझ्या संस्थेतच तयार झाला पाहिजे .या पवित्र हेतूने बापूजींनी आपल्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात एकूण आठ अध्यापक विद्यालय व व दोन अध्यापक महाविद्यालयांची स्थापना केली. बापूजींनी अध्यापक विद्यालय तासगाव या शिक्षण प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. तासगाव हे तालुक्याचे ठिकाण असून ही एक द्राक्ष भूमी आहे .तसेच तासगावला कृषी पंढरी म्हणून ओळखले जाते .येथील प्रसिद्ध गणपतीच्या शुभाशीर्वाद बापूजी यानी येथील अध्यापक विद्यालयाची स्थापना केली.

या प्रशिक्षण केंद्रातून आज पर्यंत अनेक विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करून अनेक ठिकाणी सेवाकार्य करत आहेत. २०१२ पर्यंतचे सर्व प्रशिक्षणार्थी देशभरातील विविध ठिकाणी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत .अनेक शिक्षक अधिकारी वर्ग-१ म्हणून नियुक्त झाले आहेत.

सन २०१३ नंतरच्या काळात सर्व प्रशिक्षण देणाऱ्या महाराष्ट्रातील अध्यापक विद्यालय यांना उतरती कळा लागली होती. गेल्या दहा वर्षापासून महाराष्ट्र शासनाने अधिकृत शिक्षक भरती केलेली नाही .त्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा अध्यापक विद्यालय कडे कमी कमी होत गेला.

सन २०१९ नंतर मी प्राचार्य तोरस्कर ए.बी. प्राचार्य पदी नियुक्त झालो. मी सर्व स्टाफच्या सहकार्याने तासगाव व तासगाव परिसरातील सर्व ज्युनियर कॉलेज ना भेटी देऊन, बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले .आणि विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा करता डी. एल .एड .चा अभ्यासक्रम कसा उपयोगी आहे, हे उदाहरणासह पटवून दिले .त्यामुळे आमच्या प्रशिक्षण केंद्रात सन २०१९ पासून आज २०२१ ते २२ पर्यंत कॉलेजची प्रवेश क्षमता शंभर टक्के पूर्ण केली आहे.

सन २०१३ नंतर सदर अध्यापक विद्यालयाची जुनी इमारत शासनाच्या रस्ता रुंदीकरण मोहिमेमध्ये पाडली गेली. आणि आमचे कॉलेज संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला महाविद्यालयाच्या वस्तीगृहाच्या पत्र्याच्या इमारतीमध्ये भरू लागले. सन २०१३ ते १९ पर्यंत सदर कॉलेज अपुऱ्या व गैरसोयीच्या इमारतीत भरत होते.

त्यानंतर २०१९ पासून मी प्राचार्यपदी आलो .आणि प्राचार्य डॉ. पाटील बी. एम. सरांच्या अथक प्रयत्नाने, आणि संस्थेचे कार्याध्यक्ष साहेब मा. अभयकुमार साळुंखे यांच्या आशीर्वादाने आणि मा. प्राचार्य डॉ. हुजरे मिलिंद सर पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय तासगाव, यांच्या बहुमोल सहकार्याने अध्यापक विद्यालयाच्या नवीन इमारतीचा पायाभरणी कार्यक्रम जून २०१९ रोजी भरला गेला. आणि ऑक्टोबर २०२१ पर्यंत अध्यापक विद्यालयाची नवीन इमारत साकार झाली.

ऑक्टोबर २०१९ पासून आमचे अध्यापक विद्यालय नवीन इमारतीमध्ये भरत आहे इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आठ खोल्यांचे अध्यावत बांधकाम पूर्ण झाले आहे. आज खऱ्या अर्थाने बापूजींच्या स्वप्नातील अध्यापक विद्यालयाचे कामकाज यशस्वीपणे सुरू केले आहे.

सदर नवीन इमारतीच्या बांधकामासाठी आणि एक मान्यवर मंडळींनी मोलाचे सहकार्य केले त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो .धन्यवाद .जय बापूजी.


आमच्या अध्यापक विद्यालयातील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

## अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर अंतर्गत NCTE-PAR कार्यशाळा संपन्न

दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर अंतर्गत बी.एड. व डी.एल.एड.विद्यासमिती द्वारे NCTE-PAR कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. एन.सी.टी.ई.मार्फतत शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या गुणवत्ता विकासासाठी दरवर्षी Online Performance Appraisal Report भरावा लागतो. तो फॉर्म भरत असताना योग्य फॉरमॅटमध्ये, परिपूर्ण अशी कागदपत्रे योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी लागतात. याची सर्व योग्य व परिपूर्ण माहिती आपल्या संस्थेतील शिक्षक प्रशिक्षण केंद्रांना माहिती व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेस आदरणीय मा. सचिव प्राचार्य सौ. शुभांगी गावडे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली व त्यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. जे विविध उपक्रम घेतले जात आहेत है स्तुत्य आहेत, असे कौतुक त्यांनी शब्दातून व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ उपस्थित होते. त्यांनी आपल्या वक्तव्यामध्ये सांगितले, की शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी निकाषनुसार सर्व शिक्षक प्रशिक्षण केंद्रे परिपूर्ण करणे गरजेची आहेत, या कार्यशाळेतून सर्वांनी परिपूर्ण माहिती घेऊन PAR भरावा.

कार्यशाळेस तीन मार्गदर्शक तज्ञांना निमंत्रित केले होते. सर्वप्रथम श्री तुळजाभवानी जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, तुळजापूरचे मा. प्राचार्य शशिकांत दौंड यांनी सर्वसाधारण APR साठी आवश्यक सूचना ज्या दिल्या होत्या, त्या




संदर्भात मार्गदर्शन केले. कमला नेहरू अध्यापक जुनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराडचे प्राचार्य सौ. अनिता पोतदार यांनी फॉर्म कसा भरावा? या संदर्भात मार्गदर्शन केले तसेच संस्थामाता सुशिलादेवी साळुखे शिक्षणशास्त्र महाविद्यालय उस्मानाबादचे प्रा. डॉ. रत्नाकर म्हस्के यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता कशी करावी, याचे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे अध्यक्ष बी.एड.व डी.एल.एड.विद्या समिती, अध्यक्ष मा. प्र.प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, सर्व शिक्षक प्रशिक्षण विद्यालयांना फॉर्म भरताना ज्या काही अडचणी येतील सर्वांनी एकमेकांच्या सहकार्याने सोडवू व परिपूर्ण फॉर्म भरून सर्व विद्यालयांनी सुचित करण्यात आलेल्या वेळेआधी तो पाठवावा, अशाही सूचना दिल्या.


या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अर्चना चिखलीकर यांनी केले. आभार बी. एड. व डी. एल. एड. विद्यासमिती सचिव,मा. प्राचार्य सुरेश अंकुशराव यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. सुमित्रा गुरव यांनी केले व कार्यशाळा उत्तमरित्या पार पडली.

## अभय रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर व्दारे TET ऑनलाईन वर्गाचे उद्‌घाटन

'ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' हे ब्रीदवाक्य घेऊनशिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुखे यांनी शिक्षणाची गंगा तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था सन साली स्थापन केली. आज मितीला या संस्थेच्या जवळपास शाखा समर्थपणे संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात नावारूपाला आल्या आहेत. बापुजींनी लावलेल्या छोट्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.विविध उपक्रम,विविध नाविन्यपूर्ण योजना यामुळे संस्थेचा आलेख दिवसेदिवस वाढत आहे

_ मार्च पासुन कोरोना महामारीने पूर्ण जगाला ग्रासले आणि सगळं जग जवळजवळ ठप्प झालं.सर्व शाळा,महाविद्यालये बंद झाली.विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू रहावे यासाठी online शिक्षणाचे विविध मार्ग अवलंबणे चालू झाले.यातूनच शिक्षण देण्याचे विविध मार्ग शोधणे व technosavy होण्याची गरज भासू लागली. Technosavy Teacher होत असताना विविध अडचणीचा सामना करावा लागू लागला आणि यातूनच Online training असणे गरजेचे ठरू लागले.

दि.८ ऑगस्ट रोजी मा.प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेमधील सर्व डी.एल.एड.व बी.एड.कॉलेजच्या प्राचार्यांची Zoom app द्वारे झाली. या मीटिंग मध्ये मा.पाटील सर यांनी विविध विषयावर
Online Training घेणेची कल्पना मांडली.याला सर्व प्राचार्यांनी सहमती दर्शविली.संस्थेचे सर्व पदाधिकारी व विद्यास्मिती यांच्या सौजन्याने सर्व डी.एल.एड.कॉलेजच्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांसाठी




वेबिनार चे आयोजन करणेचे ठरविण्यात आले.

या Webinar ची सुरुवात दि... रोजी कमला नेहरू ज्युनिअर कॉलेज ऑ' एज्युकेशन कराड च्या नो Meeting Training या विषयाने झाली. त्यानंतर रोज प्रत्येक डी.एल.कॉलेज कॉलेजसाठी वेगळा विषय देण्यात आला होता.त्यामध्ये E-Content तुळजापूर डी.एड.कॉलेज, Blog निर्मिती-तासगाव डी.एड.कॉलेज, Google Classroom -नळदुर्ग डी.एड.कॉलेज,तळवशे तयार करणे - उस्मानाबाद डी.एड.कॉलेज,Google Form तयार करणे - वडणगे डी.एड. कॉलेज, dvanced PPt तयार करणे- पाटण डी.एड.कॉलेज, Testmoz चा वापर करून Test तयार करणे - बी.एड.कॉलेज,Soft Skills-उस्मानाबाद बी.एड.कॉलेज, Screen रेकॉर्डिंग - तासगाव बी.एड. कॉलेज याप्रकारे Webinar चे आयोजन करण्यात आले.

दिवस रोज एका विषयाच्या परिपूर्ण मार्गदर्शनामुळे सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत झाली.सर्व डी.एल.एड.व बी.एड. कॉलेजच्या प्राचार्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे आणि मा.बी.एम.पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे Webinar ची संकल्पना यशस्वीरित्या पार पडली.

## शाखेचा इतिहास : प्रताप ज्यु. अध्यापक विद्यालय, वडनगे-निगवे

**प्राचार्य, संजय शेटे**



वडणगे-निगवे गावचे सुपूत्र हिम्मतबहादुर चव्हाण सरकार यांनी बापुजीच्या त्यागाचा व तत्वाना प्रेरित होवून आपल्या मालकिची इमारत विद्यालयास दिली.व महाराष्ट्र राज्याच्या षिक्षण विभागाच्या परवानगीने या विद्यालयाची सुरुवात झाली.

३० विद्यार्थ्याना घेवून सुरु झालेल्या विद्यालयाची सुरवात ही श्रीमान प्राचार्य नांदगावकर के.एम. यांच्या कारकिर्दित दि.१३/०६/१९६० साली श्रीमान हिम्मतबहादुर चव्हाण सरकार यांच्या भव्यदिव्य वाड्यात झाली यात ३० विद्यार्थ्याना प्रशिक्षित करुन करवीर तालूक्यातील वडणगे-निगवे दु. या परीसरातील विद्यार्थ्याना शिक्षक बनण्याची संधी उपलब्ध करुन दिली.

श्रीमान प्राचार्य नांदगावकर के.एम. यांनी दि.१३/०६/१९६० ते १/०६/६१ या कालावधीत प्रचार्य पदाची धुरा सांभाळली व विद्यालयास सुरुवात झाली कमवा शिका योजनेत श्रीमान हिम्मतबहादुर चव्हाण सरकार यांनी स्वमालकिची साडेचौदा एकर जमिन विद्यालयास दान दिली त्यात त्यांच्या वाड्याच्या परीसरातील साडेपाच एकर इमारतीस व उर्वरीत जमीन व विहिर विद्यालयाच्या इमारतीस व इतर खर्चास दिली. ज्यात विद्यालयातील तज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत काम करुन कमवा व शिका या योजनेअंतर्गत शेती पिकवू लागले यातून हालाकिची स्थिती असणारे विद्यार्थी आनंदाने ज्ञानार्जन करु लागले.या शेतातील उत्पन्न व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या शाखेचे बांधकांम पूर्ण झाले.

यात संस्था मागर्दर्शन व प.पू.डॉ. बापूजी सांळुंखे, प्रत्यक्ष श्रीमान हिम्मतबहादुर चव्हाण सरकार व पंचक्रोशीतील मान्यवराच्या हस्ते विद्यालयाच्या वास्तू निर्माणास सुरुवात झाली. ती महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. विद्यालयाच्या बांधकामात प्रत्यक्ष श्रीमान हिम्मतबहादुर चव्हाण सरकार प.पू.डॉ. बापूजी साळुंखे हिरिरीने सहभाग नोंदवून विद्यालयाचे बांधकाम पूर्णत्वास नेले. अनेक दृष्य अदृश्य हातानी कौलारू वास्तू उभारली.व तत्कालिन मा.ना. कृषिमंत्री ना. शरदचंद्रजी पवार व जि.प.कोल्हापूर चे अध्यक्ष मा. बाळासाहेब उर्फ राजाराम शंकरराव माने यांच्या शुभ हस्ते दि. २३ मार्च १९७५ या साली विद्यालयाचे स्थलातंर नव्या वास्तूत झाले.याकाळचे प्राचार्य श्री. कुलकर्णी आर.जी. यांनी संस्था नियोजन व शासनाच्या नियमानुसार या विद्यालयाचे बांधकामात विशेष लक्ष घालून ही इमारत पूर्णत्वास नेली.

या विद्यालयात विद्यार्थी संख्या ३० होती ती २००४ साली ४० करुन घेतली आहे ह्या विद्यालयात आजअखेर ३००४ विद्यार्यानी शिक्षण घेतले असून अनेक विद्यार्थी परीसराबरोबरच पूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळया शाळेत अध्यापनाचे कामकाज करत आहेत काही विद्यार्थ्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सन २००० पासूनचे काही विद्यार्थी लोकसेवा आयोगाची परीक्षा पास होवून राज्यशासनाच्या सेवेत कार्यरत आहेत काही विद्यार्थ्या राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले असून या विद्यार्थ्यांनी विद्यालयाचा लौकिक पूर्ण महाराष्ट्रात केला आहे.


आमच्या प्रताप ज्यु. कॉलेज मधील
प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांच्या मार्फत
मा. अभयकुमार साळुंखे साहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!





संपादक
प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील




कार्यकारी संपादक,
डॉ. एम. एस. उभाळे



उपसंपादक,
डॉ. मस्के आर. बी.



उपसंपादक,
प्राचार्य अंकुशराव एस. के.



उपसंपादक,
प्राचार्य तोरस्कर ए. बी.



This Bulletin is Published by Director, Internal Quality Assurance Cell (IQAC) on be half of Principal, Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalay Tasgaon, Dist. Sangli 416312